**Tarun Bharat (Saturday, 14th July 2018)**

भारत

शनिवार, १४ जुलै २०१८

# सुळकर्णा येथील ॲग्रिकल्चर कॉलेजच्या विद्यार्थ्यांतर्फे आरोग्य शिबिर

## ग्रामीण शेतीकाम अनुभव कार्यक्रमांतर्गत

वार्ताहर
केपे

ॲग्रिकल्चर कॉलेज डॉन बॉस्को सुळकर्णा येथील विद्यार्थ्यांनी ग्रामीण शेतीकाम अनुभव कार्यक्रमाच्या अंतर्गत मळकर्णे येथील जेसीआय व मळकर्णे पंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून स्थानिक आमदार प्रसाद गावकर, लिनोरा रॉड्रिगीस, उपसरपंच दीपक नाईक, पंच संदेश गावकर, अंजली नाईक, सुदेश येरागी, कल्पिता तारी, महेश वेर्लेकर, अब्दुल सय्यद, स्वामिनी रायकर व इतर उपस्थित होते.

ॲग्रिकल्चर कॉलेजचे विद्यार्थी या कार्यक्रमांतर्गत शेतकऱ्यांमध्ये राहून शेती व्यवसायासंदर्भात शिक्षण घेत असून त्याचबरोबर आधुनिक तंत्रज्ञान शेतीची माहिती शेतकऱ्यांना देत आहे. त्याचबरोबर शेती संबंधित इतर उपक्रम राबवत आहेत.

यावेळी त्यांनी स्थानिक लोकांसाठी व शेतकऱ्यांसाठी आरोग्य शिबिर आयोजित केले होते. यात कुशावती पिस्टन (मुलांचा गट) व कृषी स्प्राउट्स हा (मुलींचा गट) असे गट करण्यात आले आहेत.

यात कुशावती पिस्टन मुलांच्या गटात अक्षय परब, भूषण सांवत देसाई, रवीकुमार शिगीहाली, अभिषेक कांबळे, दिनेश रेडको, नितीन गावकर, सर्जियो फर्नांडिस तर कृषी स्प्राउट्स मुलींच्या गटात शिवंमा ओपारी, प्रियंका परब, मेघना केसरकर, स्नेहा फळदेसाई, सोनाली देसाई या विद्यार्थ्यांनी हे आरोग्य शिबिर राबवले होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रकटन प्रियंका परब यांनी केले.



मळकर्णे : येथील आयोजित केलेल्या शिबिरात विद्यार्थ्यांसोबत आमदार प्रसाद गावकर व इतर.